# सापळा केस

दिनांक १०/०८/२०२०

**आरोपी लोकसेवक प्रकाश अर्जुनराव अंभुरे वय ४५ वर्षे व्यवसाय मुख्याध्यापक, जि.प.प्राथमिक शाळा गुगळी धामणगाव रा.सहयाद्री नगर सेलु जि.परभणी यांनी ८००/– रू लाच स्विकारले बाबत यशस्वी सापळा कारवाई.**

यातील तक्रारदार यांनी ला.प्र.वि.परभणी येथे दि. ०८/०८/२०२० रोजी समक्ष हजर राहुन तक्रार दिली की, ते जिल्हा परीषद प्राथमिक शाळा,गुगळी धामनगाव,ता.सेलू जि.परभणी येथे मागील जुलै २०१९ पासून शिक्षक म्हणून नौकरी करतात तसेच ते नौकरी करीत असलेले शाळेवर मे २०१९ पासून श्री प्रकाश अर्जूनराव अंभूरे हे मुख्याधापक आहेत. दि.०६/०८/२०२० रोजी ते नेहमी प्रमाणे जिल्हा परीषद प्राथमिक शाळा,गुगळी धामनगाव,ता.सेलू जि.परभणी येथे नौकरीवर हजर असताना मुख्याध्यापक श्री प्रकाश अर्जूनराव अंभूरे यांनी त्यांना त्यांचे शाळेचे कार्यालयात बोलावून तक्रारदर यांनां कळविले कि, तुमचा आजपर्यंतचा पगार काढण्यासाठीचा मोबदला तसेच यापुढील पगार काढण्यासाटी खर्च येत आहे. इतर शिक्षकानी पैसे दिले आहेत तुम्ही हजर झाले तेव्हा पासून मला पैसे दिले नाहीत म्हणून तुम्ही मला सन २०१९ चे ५००/–रू व सन २०२० चे ५००/–रू असे एकुण १०००/–रू द्या नसता जुलै २०१९ चा व यापुढील तुमचा पगार निघनार नाही असे असे म्हणुन त्यांनी तक्रारदार यांना लाचेची मागणी केली आहे त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी.

त्यानुसार दि १०/०८/२०२० रोजी लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाहीत तक्रारदार यांना आलोसे यांनी तुमचा आज पर्यंतचा पगार काढल्याचा मोबदला म्हणून तसेच यापुढील पगार काढण्यासाठी सन २०१९ चे ५००/–रू व सन २०२० चे ३००/–रू असे एकुण ८००/–रू लाचेची मागणी करून सदर लचेची रक्कम दि. १०/०८/२०२० रोजी आलोसे प्रकाश अर्जुनराव अंभुरे वय ४५ वर्षे व्यवसाय मुख्याध्यापक, जि.प.प्राथमिक शाळा गुगळी धामणगाव रा.सहयाद्री नगर सेलु जि.परभणी यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम ८००/– रूपये स्विकारली आहे. व नमुद आरोपीस स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आलेले आहे. वर नमुद आलोसे यांचे विरूध्द पो.स्टे.सेलु येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक, नांदेड परिक्षेत्र नांदेड व श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक, नांदेड परिक्षेत्र नांदेड, श्री.भरत हुंबे, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.परभणी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. राजेश पुरी, पोह/जहागीरदार, पोह/हनुमंते, पोना/अनिल कटारे, पोना/अनिरूध्द कुलकर्णी, पोशि/धबडगे, पोह/शकील, पोना/शेख मुखीद, पोशि/मुख्तार, पोशि/चट्टे, मपोशि/दंडवते, मपोशि/सारीका टेहरे, चापोना/कदम, चापोह/चौधरी अे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकां विरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारी विरूध्द करण्यात येणा–या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी क्रमांक ०२४५२–२२०५९७**

**टोल फ्री क्रमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्रीमती कल्पना बारवकर,पोलीस अधिक्षक,ला.प्र.वि.नांदेड,परिक्षेत्र नांदेड – ८८८८८४१९६५
श्री. भरत के. हुंबे, पोलीस उप अधिक्षक – ७०२१००२११०
श्री. राजेश पुरी, पोलीस निरीक्षक – ९९२२४५६२२२

Scanned with CamScanner